नि.क्र.०५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, चे आदेशिका ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी किंवा त्यांच्या कुटुंबातील इतर व्यक्ती, वारस व प्रतिनिधी यांनी वाद मिळकतीवरील वादीच्या ताब्यास अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळणे करीता दाखल केलेला आहे.

२. वाद मिळकतीचे वर्णन :— मौजे कुंभारझरी, ता.जाफ्राबाद येथील शेत जमीन गट नं. १४२ एकूण क्षेत्रफळ ०० हे. ८०आर आकार ०२रु. ५५पैसे संपुर्ण शेतजमीन ज्याच्या चतु:सीमा खालील खालील प्रमाणे:

पूर्वेस — शरद चव्हाण यांची शेत जमीन,
पश्चिमेस — दिलीप केवट यांची शेत जमीन,
उत्तरेस — रस्ता
दक्षिणेस — दिलीप केवट यांची शेत जमीन (या पुढे वरील मिळकतीस वाद मिळकत म्हणून संबोधण्यात येईल).

वादी यांचे थोडक्यात कथन असे की :—

३. सदरचा दावा हा वादी वादमिळकतीचे मालक आहेत असे घोषित करुन मिळण्यासाठी तसेच प्रतिवादी यांनी त्यांच्या वाद मिळकतीमधील वहितीमध्ये हरकत व अडथळा करु नये म्हणुन शाश्वत मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी थोडक्यात असे कथन केले आहे की, वादी हे मौजे कुंभारझरी ता. जाफ्राबाद जि. जालना येथिल रहिवासी असुन वादी यांना वडिलोपार्जीत गट क्रं. १४२ मध्ये ४ एकर शेती आहे. महसुल अधिकारी यांच्या चुकीमुळे गट क्रं. १४२ मध्ये केवळ २ एकर शेती

दर्शविण्यात आलेली आहे. गट क्रं. १४२ याचा सर्वे ंन. ६३/१ असा सदर सर्वे नंबर मध्ये ७ एकर २५ गुंठे जमीन वादी यांचे वडिल संपत भागाजी यांच्या नावाने होती. हे की, कालांतराणे सर्वे नं. ६३/१ याचा गट नं. १४२ झाला. आणि त्या सदर गटामध्ये केवळ ९३ आर जमीन दर्शविण्यात आलेली आहे. वादी यांच्या ताब्यामध्ये सदर गटामध्ये ४ एकर जमीन असुन वादी हे सदर जमीनीचा मालक व ताबेदार म्हणुन उपभोग घेत आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यांना चार भाउ असुन गटामध्ये दर्शविलेली ९३ आर जमीन वादी व त्यांचे भाउ यांनी आपसात वाटुन घेतलेली असुन वादी यांचे भाउ यांना त्यांचे वडिलोपार्जीत असलेले इतर गटामध्ये काही जमीनी वाटुन दिलेल्या असुन वादी यांच्या नावाने सदर गटामध्ये २ एकर १८ गुंठे जमीन आलेली असुन गट क्रं. १४२ मध्ये केवळ त्यांच्या नावाने १८ गुंठे जमीन दर्शविण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता वादी हे २ एकर १८ गुंठे जमीनीचे मालक व ताबेदार आहे. हे की, वादी यांनी तहसिल कार्यालय जाफ्राबाद येथे गट नं. १४२ मधील क्षेत्र दुरुस्ती करावी म्हणुन अर्ज दाखल केलेला असुन सदरील अर्ज मा. तहसिलदार कार्यालय जाफ्राबाद येथे प्रलंबीत आहे.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की, त्यांचे मौजे कुंभारझरी येथील गट क्रं. १४२ मधील क्षे. २ एकर १८ गुंठे जमीन वहितीत असुन प्रतिवादी यांचे सदर गटामधील जमीनीशी कोणताही संबंध नसतांना प्रतिवादी क्रं. १ ते ४ हे वादी यांच्या ताब्यामधील शेतजमीन शांततामय वहितीत अडथळा निर्माण करीत आहे. दि. ०६/०२/२०२३ रोजी त्यांच्या शेतामध्ये मशागत करीत असतांना प्रतिवादी हे त्यांच्या शेतामध्ये आले व सदरील

जमीन आमची आहे असे म्हणुन वादी यांना मारहाण व शिवीगाळ केली. त्यामुळे वादी यांनी दि. ०७/०२/२०२३ रोजी प्रतिवादी यांच्या विरुध्द पो. स्टेशन टेंभूर्णी येथे तक्रार दिली. पोलिसांनी प्रतिवादी यांच्या विरुध्द दि. ०७/०२/२०२३ रोजी अदखल पात्र गुन्हा क्र. ४८/२०२३ नोंदविला व कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वादी यांनी सदरचा दावा दाखल केला आहे व दाव्याच्या अंतीम निकालापर्यत प्रतिवादी यांच्या विरुध्द तात्पुरत्या मनाई हुकुम देण्याची मागणी केली आहे.

६. सदर कामी प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स लागु होउन ते यांकामी हजर झाले आहे. प्रतिवादी यांनी वादी यांची कथने नि. १५ अन्वये म्हणने दाखल करुन पुर्णपणे नाकारली आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे. की, वादी यांनी परिच्छेद क्र. १ मध्ये त्याच्या जमीनीबाबत चुतुर्सिमे मध्ये उल्लेख केलेला नाही. गट क्र. १४२ च्या सातबा—या उतारामध्ये वादी यांच्या नावे केवळ १८ गुंठे जमीनीचे नोंद आहे त्यामध्ये वादी यांनी त्याच्या ताब्यात ०४ एकर जमीन असल्याचे चुकीचे नमुद केले आहे. वादी यांचे हे कथन चुकीचे आहे की, त्याचे मालकी व ताब्यात ०२ एकर १८ गुंठे जमीन आहे. गट क्रं. १४२ मध्ये वादी व त्याचे भाउ यांना प्रत्येकी १८ गुंठे जमीन आली आहे. त्यापैकी विलास पैठणे, विजय पैठणे यांच्या नावे प्रत्येकी १८ गुंठे जमीन, शशीकलाबाई व्यकंटराव पैठणे यांच्या नावे २० एकर जमीन, उषाबाई व इतर यांच्या नावे १९ गुंठे जमीन व संजय पैठणे यांच्या नावे १९ गुंठे जमीन आहे. अशा प्रकारे गट क्रं. १४२ मध्ये एकुन ०.९३ आर जमीन वादी व त्याचे भाउ यांच्या नावे आलेली आहे. त्याबाबतचा फेरफार दि. २३/११/१९९२ रोजी मंजुर झालेला आहे. गट क्रं. १२५ व गट क्रं. १४२ मधील जमीनी बाबत सर्जेराव संपत पैठणे यांनी त्याचे भाउ व्यकंट संपतराव पैठणे, विजय संपतराव पैठणे, विलास संपतराव पैठणे, संजय

संपतराव पैठणे या सर्वानी समान हिस्साप्रमाणे जमीन वाटुन घेतल्याबाबत फेरफार क्रं. ४८३ दि. १८/१२/१९९२ रोजी मंजुर करण्यात आलेले आहे. त्यामुळे वादी यांच्या नावे केवळ १८ आर जमीन नमुद आहे. वादी यांनी गट क्रं. १४२ मधील क्षेत्र दुरुस्ती बाबत दाखल केलेली कोणतेही कार्यवाही दाखल केलेली नाही. दि. ०६/०२/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी वादी यांना कोणतेही मारहाण किंवा शिवीगाळ केलेली नाही.

७. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, मुळ दाव्यामध्ये गट क्रं. १४२ चे एकुन क्षेत्र ०.८० आर दाखविले आहे, परंतु सातबा—या उतारानुसार गट क्रं. १४२ चे एकुन क्षे. ०.९३ आर असुन त्यामध्ये वादी याच्या नावे केवळ १८ आर जमीन आहे व उर्वरित जमीन त्याचे भाउ व इतर हिस्सेदार यांच्या नावे आहे. वादी यांनी सदर कामी चुकीच्या चतुर्सिमा दाखविल्या आहेत. कारण वादी यांचे नावे केवळ १८ आर जमीन आहे व गट क्रं. १४२ मध्ये जे हिस्सेदार दाखविले आहे. त्यापैकी कोणाचीही जमीन चतुर्सिमे मध्ये दाखविलेली नाही. त्यामुळे वाद मिळकत व त्याच्या चतुर्सिमा चुकीच्या नमुद असल्याचे दिसुन येते. वादी यांनी क्षेत्र दुरुस्ती करीता तहसिल कार्यालयात अर्ज दाखल केल्याचे कथन केले आहे. परंतु गट एकत्रिकरणात बाबतची चुक दुरुस्ती करण्याचे अधिकार संचालक भुमी अभिलेख किंवा आयुक्त भुमिअभिलेख यांना आहे. त्यामुळे एकत्रिकरण कायदयाच्या विरुध्द हक्क किंवा ताबा मान्य करणे दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही त्यामुळे वादी हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार म्हणुन घोषणा मिळणेसाठी हक्कदार नाही.

८. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी त्याची जमीन गट क्रं. १४२ बाबत दि. ०२/०२/२०२३ रोजी उपअधिक्षक भुमी

अभिलेख यांच्या कार्यालयात मोजणी फीस भरुन मोजणी करण्याचा अर्ज दिला होता. त्या अनुसार भुमापक श्री. छडीदार यांनी गट क्र. १४२ ची पाहणी केली आणि नवीन तात्रीक मशीनच्या साहयाने मोजणी काम केले व खुणा देखील कायम केल्या. त्यावेळी वादी यांना लक्षात आले की, त्यांच्या नावे गट क्रं. १४२ मध्ये कोणतेही ०.८० आर चे क्षेत्र शिल्लक निघालेले नाही. त्यामुळे त्यांनी लिहुन दिले की, मोजणी बाबत हद्द खुणाची गरज नाही आणि प्रकरण निकाली काढण्यात यावे. तसेच त्यांनी मोजणी नकाशाची प्रत देखील गरजेची नाही असे सांगितले. गट क्रं. १४२ चे क्षेत्र सातबारा नुसार योग्य निघाले असल्याने व वादी यांच्या कडे वाढीव क्षेत्र नसल्याने वादी यांनी सदरचा चुकीचा दावा दाखल केलेला आहे त्यामुळे प्रतिवादी यांनी नि. ०५ वरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

९. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. अर्ज, अभिलेखावरील दोन्ही बाजुंची कथने व कागदपत्रे तसेच दोन्ही बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदविलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे. :—

	मुद्दे	निष्कर्ष
१	प्रथम दर्शनी केस वादीच्या बाजूने असल्याचे वादी सिद्ध करतात काय?	नाही
२	न्यायाचे समतोलत्व हे वादीच्या बाजूने आहे असे वादी सिद्ध करतात काय?	नाही
३	तात्पुरता मनाई हुकुम न मिळाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल असे वादींनी सिध्द केले आहे काय ?	नाही

४ आदेश काय? अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात आला.

::कारणमिमांसा::

<u>मुद्दे क्र. १ ते ३ करिता</u> :—

१०. मुद्दे क्र. १ ते ३ हे एकमेकाशी संलग्न असल्याने व मजकुराची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मी सदरील मुद्दे एकत्र विचारार्थ घेत आहे. तात्पुरता मनाईहुकुम हा ऐच्छिक अनुतोष आहे. ते मिळण्याकरीता वादीना प्रथमदर्शनी बाजू, न्यायाचे समतोलत्व व कधीही न भरून येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे. सदरच्या बाबी वादी हे शपथपत्राच्या आधारे किंवा कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द करू शकतात. परंतू, कोणत्याही परिस्थितीमध्ये त्याला प्रतिवादीच्या दुबळया बचावाचा फायदा मिळणार नाही.

११. वादीतर्फे श्री. एस.व्ही.पैठणे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, गट एकत्रीकरणा वेळी झालेल्या चुकीमुळे गट क्रं. १४२ मध्ये ०४ एकर शेती ऐवजी ०२ एकर शेतीचा उल्लेख झालेला आहे. वादी यांना वादमिळकती मध्ये ०२ एकर १८ गुंठे जमीन आलेली आहे. परंतु सातबारा उतारा मध्ये चुकुन १८ गुंठे जमीन नमुद केलेली आहे. वादी यांनी सदर चुक दुरुस्तीसाठी तहसील कार्यालय येथे अर्ज केले आहे. वादी यांच्या जमीनीमध्ये प्रतिवादी हरकत व अडथळा करत आहे याबाबत वादी यांनी दि. ०७/०२/२०२३ रोजी अदखलपात्र गुन्हा नं. <u>४८/२०२३</u> दाखल केला होता. या वरुन असे दिसुन येते की, वादी यांनी त्यांचा वाद मिळकतीमधील ताबा प्रथमदर्शनी सिध्द केलेला आहे. प्रतिवादी हे यांच्या ताब्यात हरकत व अडथळा करत असल्याने वादी यांचे न भरुन येणारे नुकसान होत आहे. व न्यायाचे समतोलत्व वादी यांच्या बाजुने आहे त्यामुळे नि. ०५ वरील अर्ज

मंजुर करण्यात यावा.

१२. या उलट प्रतिवादी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादी यांच्या नावे सातबारा उतारा मध्ये ८० आर जमीन नमुद नाही. वादी यांनी त्यांचा ताबा सिध्द करण्याकरीता प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. वादी यांनी त्यांच्या ताब्यातील जमीनीच्या चतुर्सिमा देखील नमुद केलेल्या नाही. गट क्रं. १४२ मधील क्षेत्र देखील वादीने चुकीचे नमुद केलेले आहे. केवळ खोटी तक्रार करुन वादी यांनी प्रतिवादी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने खोटा दावा दाखल केला आहे. वादी यांनी स्वत: हा मोजणी वेळी गट क्रं. १४२ मध्ये खुणाची आवश्यकता नाही असे सांगुन मोजणी नकाशाची सुध्दा आवश्यकता नाही असे सांगितले आहे यावरुन असे दिसुन येते की, वादी यांचा वादमिळकतीमध्ये कोणताही अधिकार नाही. वाटणी फेरफार क्रं. ४८३ अनुसार वादी व त्याचे भाउ यांच्यामध्ये समान हिस्सानुसार वाटणी झाली आहे. व त्यानुसार वादी यांच्या हिस्याला १८ आर जमीन आलेली आहे. त्यामुळे वादीचा दावा हा परिपालनीय नाही. वादी हे ८० आर जमीनीवर त्यांचा ताबा सिध्द करु शकले नाही त्यामुळे वादीचा नि. ०५ वरील अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी तर्फे करण्यात आली.

१३. सदर कामी वादी यांच्या कथणानुसार गट क्रं. १४२ मधील एकुन ८० आर जमीनीचे ते मालक आहेत. परंतु महसुल अधिकारी यांच्या चुकीमुळे गट क्रं. १४२ मध्ये केवळ २ एकर शेती दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे सातबारा उतारामध्ये वादी व त्याचे भाउ केवळ ९३ आर जमीनीचा उपभोग घेत आहे असे दर्शविण्यात आले आहे. परंतु सदर दर्शविलेली ९३ आर जमीन वादी व त्याचे भाउ यांनी वाटुन घेतली आहे, व वादी यांना २ एकर १८ गुंठे जमीन गट क्रं. १४२ मध्ये मिळाली आहे. वादी यांनी

असे देखील कथन केले आहे की, त्यांच्या नावे केवळ १८ गुंठे जमीन नमुद झाली आहे परंतु त्यांनी सदर क्षेत्र दुरुंस्ती करण्याकरीता अर्ज केला आहे.

१४. वादी यांनी सदरची कथने शाबीत करण्याकरीता मौजे कुंभारझरी येथील गट क्रं. १४२ येथील सातबारा उतारा अभिलेखावर दाखल केला आहे. सदर सातबारा उताराचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट क्रं. १४२ चे एकुन क्षेत्र हे ९३ आर आहे व त्यामध्ये वादी यांच्या नावे १८ आर क्षेत्र नमुद आहे. सदर सातबारा उतारामध्ये असे कोठे ही नमुद नाही की, गट क्रं. १४२ चे क्षेत्र हे ०४ एकर आहे. वादी यांनी सदर कामी सर्वे नं. ६३/१ चा सातबारा उतारा दाखल केला आहे. व असे कथन केले आहे की, सदर सर्वे नंबर मध्ये ७ एकर २५ गुंठे जमीन ही त्यांचे वडील संपत भागाजी यांच्या नावे होती सदर सर्वे नं. ६३/१ यांचा गट नंबर १४२ झाला व त्यामध्ये चुकीचे क्षेत्र नमुद करण्यात आले आहे. परंतु वादी यांनी अभिलेखावर सर्वे नं. ६३/१ च्या गट एकत्रिकरणाच्या कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. त्यामुळे गट एकत्रिकरणावेळी कमी जमीन नमुद करण्यात आली किंवा कसे हे प्रथमी दर्शनी वादीतर्फे यानी शाबीत करण्यात आले नाही.

१५. वादी यांनी मौजे कुंभारझरी येथील गट क्रं. १४४ चा सातबारा उतारा दाखल केला आहे. सदर सातबारा उतारा हा फेरफार क्रं. ५४० अन्वये घेण्यात आला आहे, व त्यामध्ये राजु फुलसिंग केवट (प्रतिवादी क्रं. १)यांच्या नावे ८२ आर जमीनीचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु सदर सातबारा उता—याचा या दाव्याशी काय संबंध यांचा कोणताही उल्लेख वादी यांनी दाव्यामध्ये केल्याचे दिसुन येत नाही. प्रतिवादी यांनी अभिलेखावर फेरफार क्रं. ४८३ दाखल केला आहे. सदर फेरफारनुसार गट क्रं. १२५ व १४२

मधील जमीनी सर्जेराव संपतराव पैठणे यांनी समान हिस्साने स्वत व त्याचे भाउ यांना वाटुन दिल्याचे नमुद आहे. त्यामध्ये वादी यांच्या नावाचा देखील उल्लेख आहे सदरचा फेरफार हा दि. २३/११/१९९२ रोजी नमुद झाल्याचे दिसुन येते, व तो दि. १८/१२/१९९२ रोजी मंजुर झाल्याचे दिसुन येते. त्यानंतरच वादी यांच्या नावे गट क्रं. १४२ च्या सातबारा उताराला १८ आर जमीन नमुद केले असल्याचे दिसुन येते. प्रथम दर्शनी फेरफार क्रं. ४८३ वर गट क्रं. १४२ मधील नोंदी या बरोबर असल्याचे दिसुन येते.

१६. प्रतिवादी यांनी सदर कामी गट क्रं. १४२ मध्ये झालेला दि. ०२/०२/२०२३ रोजीच्या पंचनाम्याची प्रत याकामी दाखल केली आहे. सदर पंचनाम्याचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, सदर कामातील वादी यांनी गट क्रं. १४२ मधील मोजणी करण्यासाठी उपविभागीय भुमिअभिलेख कार्यालय येथे मोजणी शुल्क भरल्यानंतर त्याठिकाणी मोजणीदारी मोजणी करण्यासाठी आले होते. त्यानी अर्जानुसार मोजणी देखील केली परंतु अर्जदार म्हणजेच वादी विलास पैठणे यांनी हद्‌दी खुणाची आवश्यकता नाही असे सांगुन त्याचा मोजणी प्रकरणावर कार्यवाही न करणेस त्याची हरकत नाही व त्यांना मोजणी प्रतीची सुध्दा आवश्यकता नाही असे पंचासमक्ष सांगितले आहे. यावरुन गट क्रं. १४२ ची मोजणी वादी यांनीच होउ दिली नाही असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१७. प्रतिवादी यांनी फेरफार क्रं. ३१३ ची प्रमाणित नक्कल दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसुन येते की, वादी याचे वडील संपत भागाजी पैठणे यांनी सर्वे नं. ६३/३ मधील एकुन क्षेत्रफळ ७ एकर २९ गुंठे पैकी ०२ एकर जमीन विकत घेतली होती. सर्वे नं. ६३ चे कोणते गट झाले याबाबत चा कोणताही ठोस पुरावा वादी किंवा प्रतिवादी यांच्याकडुन

आलेला नाही. तसेच प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या गटएकत्रिकरणाच्या कागदपत्रावरुन देखील नेमके किती क्षेत्रफळाचे किती गट करण्यात आले हे देखील स्पष्ट होत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी अभिलेखावर दाखल गट क्रं. १४२ च्या सातबारा उता—यावरुन असे दिसुन येते की, वादी यांच्या ताब्यात गट क्रं. १४२ मधील १८ आर जमीन आहे. दाव्यामध्ये नमुद ८० आर जमीन वादीच्या मालकी व ताब्यात असल्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा वादी यांनी अभिलेखावर आणलेला नाही. तसेच वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हा नं. ४८/२०२३ च्या प्रतिमध्ये देखील प्रतिवादी हे वादीच्या वादमिळकती मधील ताब्यात हरकत व अडथळा करत आहे असे नमुद केलेले नाही. त्यामध्ये केवळ प्रतिवादी हे शेतीच्या कारणावरुन वादीच्या अंगावरधावुन *आले असे नमुद करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रतिवादी हे वादीच्या वादमिळकतीम*धील ताब्यात हरकत व अडथळा निर्माण करत आहे असे प्रथमदर्शनी शाबीत झाले नाही. वादी यांना वादमिळकतमधील त्यांचा प्रथमदर्शनी ताबा सिध्द करता न आल्याने न्यायाचे समतोलत्व अंतरिम मनाई हुकुम देण्याच्या हक्कात आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे वादीचा अंतरिम मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होणार नाही. करीता मी खाली आदेश पारीत करते.

: <u>आदेश</u> :

१. नि.क्र.५ वरील अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

Digitally signed by GADE APARNA DAYANAND
Date: 2024.11.18 16:51:27 +0530

(अपर्णा डी.गाडे)

दिनांक: १३/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),जाफ्राबाद

: प्रमाणपत्र :—

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

स्वाक्षरित/—

(अहमद शेख)

दिनांकः— १३/११/२०२४. लघुलेखक.